ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष ३० | पुणें, बुधवार, १ जानेवारी, १९६४ | अंक १

## विविध माहिती

**राजकीय पक्षांना देणग्या देऊं नका**—आचार्य विनोबा भावे ह्यांनीं रायपूर येथें प्रार्थनेनंतरच्या सभेंत व्यापाऱ्यांना अशी विनंती केली कीं व्यापाऱ्यांनीं ग्रामदान मिळालेल्या खेड्यांत ग्रामसभेचे सभासद व्हावे. प्रार्थना-सभेच्या १५ हजार श्रोत्यांपुढें बोलतांना त्यांनीं राजकीय पक्षांना व्यापाऱ्यांनीं देणग्या देऊं नये आणि देणग्या द्यावयाच्याच असल्या तर समाजोपयोगी सार्वजनिक कामाला द्याव्या अशी विनंती केली.

**सीलोनच्या सरकारचें दैनिक**—सीलोन सरकारच्या माहितीखात्यातर्फे सध्यां 'श्रीलंका' ह्या नांवाचें साप्ताहिक प्रसिद्ध करण्यांत येत असतें. ह्या साप्ताहिकाचें आतां दैनिकांत रूपांतर करण्याचें सरकारनें ठरविलें आहे. दैनिक सुरू झालें म्हणजे सरकारी खात्यांच्या व्यापारी स्वरूपाच्या जाहिराती फक्त त्यांतच प्रसिद्ध करण्यांत येतील. साप्ताहिकाचें दैनिकांत रूपांतर करण्यासाठी लागणाऱ्या पैशाची व माणसांची तरतूद करण्यांत आली आहे.

**चुकविलेल्या करांच्या पैशाचा उपयोग**—भारताचे उपाध्यक्ष डॉ. झकीर हुसेन इंदूर येथें एका शिक्षणसंस्थेंत भाषण करतांना म्हणाले कीं, श्रीमंत लोकांनीं मोठ्या हिकमतीनें चुकविलेल्या करांच्या पैशाचा उपयोग शिक्षणसंस्थांना देणग्या देण्यासाठी करावा व समाजहित साधावें.

**केळ्यांच्या लागवडीला उत्तेजनच मिळेल**—भारतामधील केळ्यांची आतां परदेशांत अधिक प्रमाणांत निर्यात होऊं लागली आहे. त्यामुळें देशांतील केळ्यांच्या किमती वाढून गरिबांना परवडणारें हें एकच एक सत्त्वयुक्त फळ त्यांच्या आंवाक्याबाहेर जाईल अशी भीति लोकसभेंत व्यक्त करण्यांत आली होती. ह्या भीतीचें निरसन करतांना आंतरराष्ट्रीय व्यापारखात्याचे मंत्री श्री. मनुभाई शहा म्हणाले कीं, केळ्यांच्या वाढत्या निर्यातीमुळें देशांत केळ्यांची टंचाई निर्माण होणार नाहीं. उलट त्यामुळें केळ्यांच्या लागवडीस उत्तेजनच मिळेल.

**वकिलांच्या सामुदायिक संघटना**—पोलंडच्या पार्लमेंटनें वकिलांच्या धंद्याविषयीं नवीन कायदा करून वकिलांना खाजगी धंदा करण्याची बंदी केली आहे. कायद्याला अनुसरून वकिलांच्या सामुदायिक संघटना उभारण्यांत यावयाच्या असून संघटनेच्या सभासदालाच कोर्टांत अशिलांचें काम पहातां येईल. संघटनेंत सामील न होणाऱ्या वकिलांना राज्यांतील सरकारी संस्थांचे कायदेशीर सल्लागार म्हणून काम करण्याचा पर्याय ठेवण्यांत आला आहे. तेथील वकिलांची संख्या ५,७०० आहे.

**सिमेंटच्या कारखान्यांची मागणी**—चीननें नेपाळमध्यें सिमेंटचा कारखाना काढण्यासाठी मदतीचें आश्वासन दिलेलें होतें. त्याशिवाय कागदाचा कारखाना काढण्याचीहि तयारी चीननें दाखविली होती. ह्या दोन्हीं कारखान्यांची यंत्रसामग्री कारखान्यांच्या जागांवर हलविणें शक्य नसल्याची सबब सांगून चीननें ह्या बाबतींतील जबाबदारी झटकली आहे. आतां नेपाळ रशिआकडे कारखान्यांसाठी मदत मागत आहे.

**अपघातामधील लष्करी अधिकारी**—जम्मूजवळ झालेल्या हेलिकॉप्टरच्या अपघातांत ५ बडे हिंदी लष्करी अधिकारी निधन पावले. एकाच विमानांत दोनपेक्षा अधिक लष्करी अधिकाऱ्यांनीं प्रवास करूं नये अशी सूचना दिवंगत राष्ट्राध्यक्ष बाबू राजेंद्रप्रसाद ह्यांनीं केली होती. १९५२ सालीं सहा लष्करी अधिकारी घेऊन एक विमान जात असतां लखनौ-दिल्ली मार्गावर विमानाला होणारा अपघात नशिबानें टळला होता. त्याला अनुसरून त्यांनीं वरील सूचना केली होती. ह्या भाग्यवंत विमानांत इतर लष्करी अधिकाऱ्यांबरोबर जनरल श्रीनागेश, जनरल थोरात व जनरल थिमय्या हेहि होते.

**गव्हाच्या किमती पटल्या नाहींत**—रशिआंतील गव्हाची टंचाई नाहींशी करण्यासाठी अमेरिकेकडून गहूं घेण्याच्या वाटाघाटी करण्यासाठी रशिआचें प्रतिनिधीमंडळ अमेरिकेला गेलें होतें. परंतु तें सौदा न करतांच परतलें आहे. अमेरिकन गव्हाच्या किमती रशिआला फार वाटल्या, असा अंदाज करण्यांत येत आहे. शिवाय सौदा झाल्यास निम्मा गहूं अमेरिकन बोटींतून नेण्यांत आला पाहिजे, अशी अट अमेरिकेनें घातली होती. अमेरिकन बोटींचे वहातुकीचे दर इतर देशांच्या मानानें बरेच अधिक आहेत.

**ख्रिस्तिन कीलरची कथा**—ब्रिटनमधील ख्रिस्तिन कीलर प्रकरणावर आधारित असा चित्रपट तयार करण्यांत आला असून डेन्मार्कच्या चित्रपट-निरीक्षण मंडळाला ह्या चित्रपटांत कांहींच आक्षेपार्ह दृश्यें आढळलेलीं नाहींत. हा चित्रपट डेन्मार्कमध्यें दाखविण्यावद्दल एकच निर्बंध घालण्यांत आला आहे. १६ वर्षें वयाखालील मुलांना मात्र तो निषिद्ध ठरविण्यांत आला आहे.

**कंत्राटी कामाची पद्धत बंद**—महाराष्ट्र शुगर मिल्स आणि बेलापूर शुगर कंपनी ह्या दोन कारखान्यांनीं कंत्राटी कामाची पद्धत बंद करण्याचें ठरविलें आहे. कारखान्यांतील सुमारें २,५०० कामगारांना आतां रोजंदारी पद्धतीनें वेतन दिलें जाईल. ही कंत्राटी पद्धत बंद झाल्यामुळें दोन्हीं कारखान्यांना मिळून वेतनापोटीं दरसाल ३॥ लाख रुपये जादा द्यावे लागतील.

**परदेशीय शिक्षणतज्ज्ञांचा सल्ला**—भौतिक शास्त्रें आणि गणित ह्यांच्या शिक्षणाविषयीं भारताच्या शिक्षणखात्याला सल्ला देण्यासाठी कांहीं परदेशीय शिक्षणतज्ज्ञ भारतांत आले आहेत. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या शिक्षणशास्त्र व सांस्कृतिक संघटनेनें विनंती केल्यावरून ते आले आहेत. ह्या तज्ज्ञांत ७ रशिअन तज्ज्ञांशिवाय अमेरिकन आणि स्वीडिश तज्ज्ञहि आहेत.

**भारतीय बनावटीचा रणगाडा**—मद्रासमधील अवजड वाहतूक गाड्यांच्या कारखान्यांत रणगाडे बनविण्यांत येणार आहेत. त्यांपैकी पहिला रणगाडा १९६५ मध्यें तयार होईल. ह्या कारखान्याच्या उभारणींपैकी ६० टक्के काम झालेलें आहे. कारखान्याच्या कांहीं भागांतील यांत्रिक हत्यारें थोडेंफार कामहि करूं लागलीं आहेत.

**माशांच्या निर्यातींत वाढ**—समुद्रांतील खाद्यपदार्थांची निर्यात वाढविण्यासाठी स्थापन करण्यांत आलेल्या मंडळानें असें जाहीर केलें आहे कीं, चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत भारतानें ८४ लाख, ८२ हजार किलोग्रॅम मासे व इतर खाद्य जलचर प्राणी निर्यात केले. ह्या निर्यातीमुळें भारताला २·८८ कोटी रुपयांचें परदेशीय चलन मिळालें. गेल्या आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत ह्या प्राण्यांच्या निर्यातीमुळें भारताला १·५७ कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची प्राप्ति झाली होती.

**एअर इंडिआचा नफा**—एअर इंडिआ कॉर्पोरेशननें आपल्या साधारण भांडवलावर ५ टक्के नफावांटणी जाहीर केली आहे. कॉर्पोरेशनचें राष्ट्रीयीकरण झाल्यावर झालेली ही पहिलीच नफावांटणी आहे. भारत सरकारनें कॉर्पोरेशनमध्यें गुंतविलेल्या भांडवलांतील नफ्याची ६६·६९ लाख रुपयांची रक्कम एका चेकनें सरकारला देण्यांत आली.

**दुरावलेल्या नातलगांच्या भेटीगांठी**—बर्लिन शहराच्या पूर्व भागाला पश्चिम भागापासून अलग राखण्यासाठी पूर्व जर्मन सरकारनें बांधलेली भिंत शहरांतील नातलगांच्या भेटीगांठींला मोठा अडथळा आहे. परंतु पूर्व जर्मन सरकारनें २५ डिसेंबरच्या नाताळच्या पहिल्या दिवशीं पश्चिम जर्मनींतील लोकांना एक दिवसाचे परवाने देण्याची तयारी दाखविली. त्याचा फायदा घेऊन २५ डिसेंबरपूर्वी चार दिवसांत १ लाख, ३ हजार लोकांनीं परवाने घेतले. परवान्यांचा वापर करून पश्चिम बर्लिनमधील सुमारें २ लाख, ७० हजार नागरिकांनीं पूर्व जर्मनीमधील आपल्या नातेवाइकांच्या गांठीभेटी घेतल्या. परवान्याची तपासणी करून पूर्व बर्लिनमध्यें प्रवेश करण्यासाठी ४ नाकीं बसविण्यांत आलीं होतीं. ह्या नाक्यांवरून २,५०० मोटारींनीं परवाने दाखवून प्रवेश मिळविला.

**जपानी बोट कंपन्यांची पुनर्घटना**—जपानमधील ९० बोटवाहतूक कंपन्यांची पुनर्घटना करण्यांत आली असून आतां फक्त ६ प्रचंड बोट कंपन्या वाहतूक करणार आहेत. ह्या कंपन्यांपैकी प्रत्येक कंपनीजवळ १० लाख टन वजनाच्या बोटी आहेत. कंपन्यांची पुनर्घटना करण्यांत आल्यामुळें जपानला परदेशीय बोटवाहतूक कंपन्यांशीं अधिक जोराची स्पर्धा करतां येईल. एका पुनर्घटित कंपनीजवळ तर २३ लाख, २९ हजार टन वजनाच्या २०४ बोटी आहेत. ही कंपनी ब्रिटनच्या पी. अँड ओ. ह्या कंपनीच्या तोडीची झाली आहे.

## बर्मा शेल कंपनीशीं नवा करार?

भारतांत तेल शुद्ध करण्यासंबंधीं नवीन करार करण्याविषयीं बर्मा शेल कंपनी मध्यवर्ती सरकारच्या पेट्रोल खात्याशीं लवकरच वाटाघाटी सुरू करणार आहे. मद्रास येथें नवा तेलशुद्धीचा कारखाना काढण्यासाठी कंपनी कांहीं योजना पुढें मांडील असा अंदाज आहे. दुसरी एक कंपनीहि हा कारखाना काढण्यास उत्सुक आहे. संकल्पित कंपनींत अधिकांश भांडवल सरकारचें असण्यास बर्मा शेल बहुधा हरकत घेणार नाहीं. कम्युनिस्ट देशांकडून, विशेषतः रशिआकडून मिळणाऱ्या तेलाच्या किमतीशीं कंपनीच्या किमती जुळत्या असाव्यात असें सरकारचें म्हणणें आहे आणि तें कंपनीनें मान्य केलें आहे. कंपनीशीं होणाऱ्या नव्या करारांत भारत सरकारवर परदेशीय हुंडणावळीबाबत कांहीं बोजा पडणार नाहीं. भारताला नको असणारें मोटार स्पिरिट निर्यात करण्याचेंहि कंपनीनें कबूल केलें आहे.

## सरकारी चित्रपट-निर्मितीगृहाला पैसा नाहीं

कानडी चित्रपटाच्या निर्मितीसाठी सार्वजनिक मालकीच्या विभागांत एखादा स्टुडिओ काढण्यास म्हैसूर सरकारजवळ पैसा नाहीं, असें उत्तर राज्य विधानसभेंत सरकारतर्फें देण्यांत आलें. तथापि, खाजगी भांडवलदारांनीं ह्या उपक्रमांत भाग घेतल्यास सरकार साधारण भाग घेऊन त्यांना मदत करण्यास तयार आहे. उद्योगधंद्यांना मदत करण्याच्या कायद्याप्रमाणें काय करतां येईल ह्याचा विचार चालू आहे. आंध्र प्रदेश सरकारच्या संबंधित कायद्याचा अभ्यास म्हैसूर सरकार करणार आहे.





Good news for Small Industrialists

Under an arrangement with the Government of Maharashtra, small industrialists are offered a facility of loans from Rs. 3000 to 10,000 at 3 per cent rate of interest.

Repayment between 5 to 10 years.

Avail of the opportunity to develop your industry for Nation's Progress

Contact our nearest branch or write to our Central Office for the details of the Scheme.



The Bank of Maharashtra Ltd.,

Regd. Office - 1177 Budhwar Peth, Poona 2.

# अर्थ

बुधवार, १ जानेवारी, १९६४





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद् वामन काळे


## कोळशाच्या खाणींचें राष्ट्रीयीकरण नाहीं.

भारताची औद्योगिक प्रगति झपाट्यानें घडवून आणण्यासाठी परदेशीय भांडवलाची मोठ्या प्रमाणावर गरज आहे; परंतु भारत सरकारच्या औद्योगिक धोरणाविषयीं परदेशीय भांडवलाला साशंकता वाटत असते. कोळशाच्या खाणी ह्या मूलभूत उद्योगधंद्यांत मोडणाऱ्या आहेत. ह्या खाणींत गुंतविल्या जाणाऱ्या भांडवलाविषयीं भारत सरकारच्या पोलाद् आणि खाणमंत्र्यांनीं केलेला खुलासा परदेशी भांडवलाला दिलासा देणारा आहे. खाजगी मालकीच्या कोळसाखाणींत जागतिक बँकेतर्फे गुंतविण्यांत आलेल्या परदेशीय भांडवलाबाबत सरकारनें कांहीं आश्वासन दिलें आहे काय, असा प्रश्न राज्यसभेंत विचारला गेला होता. त्याला उत्तर देतांना संबंधित मंत्री श्री. सुब्रह्मण्यम् म्हणाले कीं, सरकारनें जागतिक बँकेला असें कळविलें आहे कीं खाजगी मालकीच्या विभागांतील कोळसाखाणींचें राष्ट्रीयीकरण करण्याचा सरकारचा हेतु नाहीं. मात्र सार्वजनिक मालकीच्या कोळसाखाणींचा विस्तार व विकास घडवून आणण्याचा सरकारचा इरादा आहे. तिसऱ्या व चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत कोळशाचें उत्पादन वाढविण्याच्या मोठ्या योजना आखण्यांत आल्या आहेत. खाजगी व सार्वजनिक मालकीच्या कोळसाखाणींची उत्पादनक्षमता लक्षांत घेऊन दोन्हीं विभागांना कोळशाच्या उत्पादनाचें लक्ष्य गाठण्याच्या कामीं मुभा देण्याचें ठरविण्यांत आलें आहे. खाजगी मालकीच्या कोळशाच्या खाणींना आर्थिक साह्य देतांना जागतिक बँकेनें कांहीं अटी घातलेल्या आहेत, असा प्रकार नाहीं. पण खाजगी खाणींचे मालक बँकेकडे जेव्हां कर्जें मागूं लागले तेव्हां खाणींच्या राष्ट्रीयीकरणाची शक्याशक्यता काय आहे, ह्याबाबतची चौकशी बँकेतर्फे करण्यांत आली होती.

## राजस्थानमधील अणुवीज केंद्राबद्दल करार

राजस्थानमध्यें राणा प्रतापसागर ह्या ठिकाणीं अणुशक्तीवर वीज उत्पन्न करणारें केंद्र उभारण्यांत यावयाचें आहे. केंद्राच्या उभारणीसंबंधीं कॅनडाबरोबर दोन करार करण्यांत आले आहेत. संकल्पित वीजकेंद्रांत २०० मेगॅवॅट विजेचें उत्पादन करण्यांत येणार आहे. राजस्थानमधील अणुशक्ति वीजकेंद्राचा एक विशेष असा आहे कीं, ह्या केंद्रांत प्रथमच भारतांत तयार झालेलें आण्विक इंधन वापरण्यांत येणार आहे. अणुशक्तीचा वापर शांततामय करण्याचें बंधन कॅनडा आणि भारत ह्या देशांनीं एकमेकांवर आपण होऊन घालून घेतलें आहे आणि ह्या बंधनाची अंमलबजावणी नीट होते कीं नाहीं हें पहाण्यासाठी उभयतां देशांना एकमेकांच्या अणुभट्ट्या तपासण्याचे अधिकार एका कराराप्रमाणें देण्यांत आलेले आहेत. अणुभट्टी चालूं करण्यासाठी लागणारें इंधन सर्वच्या सर्व भारताला स्वतःच पुरवतां येणें शक्य नसल्यानें निम्मे युरेनिअमचें इंधन कॅनडा पुरविणार आहे. कांहीं काळानंतर केरळमधील युरेनिअममिश्रित खनिजापासून तयार केलेलें इंधन अणुभट्टीसाठी वापरण्यांत येऊं लागेल. भारताच्या अणुशक्तीमंडळातर्फे वीजकेंद्राची उभारणी करण्यांत येणार आहे. कॅनडा व भारत ह्यांनीं परस्परांना अणुविज्ञानविषयक तांत्रिक आणि शास्त्रीय माहिती पुरविण्याचें मान्य केलें आहे. कॅनडांतील अणुभट्टीच्या नमुन्याप्रमाणें राजस्थानमधील अणुभट्टी उभारण्यांत येणार असल्यानें त्यासंबंधींचे आराखडे व नकाशे कॅनडाच उपलब्ध करून देईल. ह्या कामासाठी कॅनडाला सुमारें ५० लाख डॉलर्स खर्च येईल; परंतु, सध्यांच भारताकडून कॅनडा ह्या प्राथमिक खर्चाबद्दल कांहीं घेणार नाहीं. अणुभट्टी उभारण्यासाठी तांत्रिक व आर्थिक तपशील ठरविण्यांत आला असून त्यासंबंधींचा करार स्वतंत्र आहे.

## शेतीच्या मालाच्या उत्पादनखर्चाचा अभ्यास

भारत स्वतंत्र झाल्यानंतर देशांतील औद्योगीकरणाला जोरानें चालना मिळाली असली तरी अजूनहि राष्ट्रीय उत्पन्नांत शेतीच्या मालाचें उत्पादनच अधिक आहे. औद्योगिक मालापेक्षा शेतीच्या मालाच्या किमतींत चढउतार अधिक होतात. त्यामुळें किफायतशीरपणाच्या दृष्टीनें शेतीचा धंदा अनिश्चित असतो. अलीकडे शेतीच्या मालाच्या किंमती बांधून देण्यासंबंधी विचार होऊं लागला आहे. परंतु, शेतीच्या मालाच्या उत्पादनखर्चासंबंधी आंकडेवार माहिती नीटशी उपलब्ध नसल्यानें किमती बांधून देण्याचा प्रश्न अडचणीचा झाला आहे. मध्यवर्ती सरकारच्या शेती व अन्न खात्यानें शेतीच्या मालाच्या उत्पादनखर्चाचा अभ्यास अधिक पायाशुद्ध करण्याचा विचार चालविला आहे. सध्यां शेतीच्या मालाच्या किमान किमती ठरवितांना विवक्षित मालाच्या बाजारांतील भाव, त्या मालाशीं स्पर्धा करणाऱ्या इतर मालाच्या किमती आणि कांहीं वर्षांच्या काळांत आढळून येणारी किमतीची पातळी ह्यांचा विचार करण्यांत येतो. १९५४–५५ सालांत कांहीं राज्यांतून शेतीवाढीच्या आर्थिक व्यवहारांचा अभ्यास करण्यांत आला होता. पण, ही माहिती तुटपुंजी असून ती कांहीं प्रमुख पिकांच्यासंबंधींच फक्त मिळूं शकते. मुख्यतः भात, गहूं, ऊंस, आणि कापूस ह्या मालाच्या उत्पादनखर्चाबद्दलच थोडीबहुत माहिती उपलब्ध आहे. त्याशिवाय भारताच्या शेतीसंशोधन संस्थेतर्फेहि कांहीं तात्कालिक स्वरूपाचे उत्पादनखर्चाचे अभ्यास करण्यांत येत आहेत. अशा प्रकारच्या अभ्यासांना साधारणपणें तीन वर्षांचा अवधी लागतो. १९६०-६१ सालीं कापूस, तेलबिया, इत्यादींच्या उत्पादनखर्चाचा अभ्यास करण्यांत आला आहे. त्यासंबंधींची माहिती लवकरच हातीं येईल. दरम्यान १९६२-६३ सालांत ताग आणि भात ह्यांच्या उत्पादनखर्चाचा अभ्यास करण्यांत येत आहे.

## हिंदी टेलिफोन डिरेक्टरी

टेलिफोन डिरेक्टरी हिंदीमध्यें असावी, अशी हिंदी भाषेच्या मुलखांतहि फारच थोडी आहे. सध्यां जयपूर आणि इंदूर एक्सचेंजची डिरेक्टरी इंग्रजीबरोबर हिंदीमध्येंहि छापली जाते.

## तुम्हीं कोट्याधीश व्हाल का ?

### आपली मानसिक तयारी तपासून पाहा

अगदीं दरिद्री मनुष्यसुद्धां, आजच्या भारी करांच्या काळांतहि, कोट्याधीश होऊं शकतो. पैसे मिळविण्याचा खंबीर निर्धार त्यासाठी तर हवाच; त्याबरोबर इतरहि गुणांची आवश्यकता असते. तुमच्यांतहि हे गुण कदाचित् असतील; तपासून पाहा :—

( १ ) एखादी चूक फार नुकसानीची ठरली, तर तुम्हीं त्यानें खिन्न होऊन बसता, का अनुभवखातीं जमा करून पुढें जाता ?

( २ ) मनांतल्या मनांत तुम्हीं हिशेब करूं शकता का ?

( ३ ) खरं सांगा—आलेल्या प्रत्येक संधीचा फायदा तुम्हीं घेता का ?

( ४ ) तुम्हीं ज्या उद्योगांत काम करता, त्याच्या व्यापारी प्रश्नांचा, अडचणींचा, तुम्हीं कधीं विचार करता का ? त्याचा तुमच्या नोकरीशीं प्रत्यक्ष संबंध नसला तरी ?

( ५ ) तुम्हाला एकदम एखाद्या मोठ्या व्यापारी संस्थेचे प्रमुख केले, तर तुम्ही गोंधळून जाल का ?

( ६ ) ठराविक काळांत ठराविक रक्कम वांचविण्याचें तुम्हीं ठरविलें, तर तशी वाचवूं शकता का ?

( ७ ) तुमची पात्रता असताहि बढती मिळाली नाहीं, असें कधीं घडलें आहे का ?

( ८ ) तुमच्यापेक्षा अधिक यशस्वी किंवा वजनदार माणसांत तुम्हीं सहजतेनें मिसळूं शकता का ?

( ९ ) तुम्ही नव्या नोकरीसाठी गेला आणि नव्या मालकानें तुमच्या अपेक्षेपेक्षा जास्त पगार देऊं केला, तर तुमचा चेहरा तुमचें आश्चर्य दडवूं शकेल का ?

( १० ) एखाद्यानें तुमच्या हातीं मोठी रक्कम देऊन त्याच्यासाठी गुंतविण्यास सांगितलें, तर तुम्हीं ती जबाबदारी टाळाल का ?

( ११ ) विश्रांतीची वेळ खर्चून तुमच्या रिकाम्या वेळांत जास्त पैसे मिळविण्याची संधि आली, तर ती तुम्हीं घालवाल का ?

( १२ ) अकौंटन्सी, बुककीपिंग, अर्थशास्त्र, इत्यादींचा अभ्यास करण्याचें तुम्हीं कधीं मनावर घेतलें होतें का ?

( १३ ) एखादा नवा धंदा यशस्वी होईल किंवा नाहीं, ह्याचा अंदाज साधारणपणें बरोबर तुम्हांस करता येतो का ?

( १४ ) तुमचें स्वतःचें काम अधिक कार्यक्षमतेनें किंवा काटकसरीनें करण्याची यशस्वी कल्पना तुम्हांस सुचली आहे का ?

( १५ ) बँकेंतील पैसे संपले तरी हरकत नाहीं, पण आपल्या भोंवतीं सुखसमृद्धीचीं साधनें असावींत असें तुम्हांस वाटतें का ?

( १६ ) तुम्हीं योजलेल्या उपक्रमावर तुमचा भरपूर विश्वास आहे; तुम्ही तुमची सर्व पुंजी त्यांत गुंतविण्यास तयार व्हाल का?

( १७ ) वाढत्या वयोमानाप्रमाणें कमी काम करण्याची अपेक्षा तुम्हीं बाळगून आहांत काय ?

( १८ ) इतरांच्या आधीं माहिती आणि बातम्या मिळविण्याची हातोटी तुमचेजवळ आहे काय ?

( १९ ) तुमची नोकरी बदलून दुसरीकडे बराच जास्त पगार मिळण्याची शक्यता असेल, तर त्या बाबतींत तुम्हीं निर्णय सत्वर घेऊं शकाल का ?

( २० ) एकाच वेळीं अनेक महत्त्वाच्या गोष्टींचें अवधान राखणें तुम्हांस जमतें का ?

---

## आर्थिक विकासासाठी शिक्षणाचें महत्त्व

मदुरा कॉलेजच्या वाढदिवसाच्या प्रसंगीं बोलतांना दिल्ली विद्यापीठाचे उपकुलगुरु डॉ. सी. डी. देशमुख ह्यांनीं शिक्षणासंबंधीं कांहीं महत्त्वाचे विचार प्रकट केले आहेत. डॉ. देशमुख म्हणाले कीं, गेल्या कांहीं वर्षांत अविकसित देशांच्या साधनसामग्रीचा विकास करण्याचें महत्त्व अधिकाधिक लोकांना पटूं लागलेलें आहे. शिक्षणाच्या विशेषतः उच्च शिक्षणाच्या उपयुक्तपणाकडे लोकांचें लक्ष लागत चाललेलें आहे. भारताचें नियोजनमंडळहि सध्यांच्या परिस्थितीला अनुकूल असणारी शिक्षणाची घडी बसविण्याचा विचार करूं लागलेले आहे. ब्रिटनसारख्या उद्योगप्रधान देशांत सुद्धां ७० टक्के विद्यार्थी धंदेशिक्षण अगर व्यावसायिक शिक्षण घेतांना दिसतात. भारतांत हें प्रमाण फक्त ३० टक्के आहे. भारतांत व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्थांची संख्या वाढत आहे परंतु त्यांत काम करण्यासाठी शिक्षकांची वाण पडत आहे. कोणत्याहि देशाचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी त्याच्या शिक्षणपद्धतीचा विकास आधीं करण्यांत आला पाहिजे. पण, शिक्षणाचा विकास घडवून आणण्याचें काम दीर्घ कालावधीचें आहे. म्हणून शिक्षणाचा विकास करतांना कल्पनाशक्तीचा आणि दूरदृष्टीचा वापर करण्यांत आला पाहिजे. विद्येचें क्षितिज विस्तृत करण्याच्या कामीं भारतानें आपली स्वतःची भर घालण्याची वेळ आतां आलेली आहे. तसें झालें नाहीं तर जगांतील देशांत भारताचें स्थान खाली घसरल्याशिवाय राहणार नाहीं. विद्यापीठांतून देण्यांत येणाऱ्या शिक्षणासंबंधीचा दृष्टीकोण आतां बदलत चाललेला आहे. याविषयीं असें म्हणतां येईल कीं, पदवी परीक्षेचा अभ्यास करण्यास सर्वांना मुभा असावी. पण पदवीबाबतच्या प्रवीणतेचा अभ्यासक्रम विशेष हुषार विद्यार्थ्यांनींच स्वीकारावा.

---

## राणीच्या लवाजम्यांत कपात होणार

इंग्लंडची राणी एलिझाबेथ हिच्या बकिंगहॅम राजवाड्यांतील लवाजमा व नौकरवर्ग कमी करण्यांत येणार आहे. राजवाड्यांतील कामाची पद्धत अधिक कार्यक्षम करण्यासाठी काय करावें ह्याविषयीं सूचना देण्यासाठी तज्ज्ञांची एक कमिटी नेमण्यांत आली होती. कमिटीनें केलेल्या शिफारसी आधुनिक काळाला साजेशा आहेत. राजवाड्याच्या निरनिराळ्या खात्यांत आधुनिक उपकरणें बसवावींत, राजवाड्यांतच कचेऱ्यांचें स्थलांतर करावें आणि पत्रव्यवहारांत होणारी द्विरुक्ति टाळावी अशा शिफारसी करण्यांत आल्या आहेत. इंग्लंडच्या राजघराण्यांतील ज्या व्यक्तींना खुनाच्या धमक्या देण्यांत आल्या होत्या त्या प्रकरणाविषयींची माहिती अधिक शास्त्रीय पद्धतीनें लावून ठेवण्याची शिफारस मुद्दाम करण्यांत आली आहे. ज्या लोकांनीं राजघराण्यांतील व्यक्तींना धमक्या दिल्या त्यांची तपशीलवार माहितीच मुख्यतः ह्या प्रकरणांत आहे. लवाजम्यांत कपात होणार असली तरी नौकरांच्या संख्येंत तावडतोब कपात करण्यांत येणार आहे, असा त्याचा अर्थ नाहीं. एखादी जागा रिकामी झाल्यास ती पुन्हां नव्यानें भरण्यांत येणार नाहीं, इतकेंच. बकिंगहॅम राजवाड्यांत ६०० दालनें आहेत. राजवाड्यांतील व्यवस्था नीट राखण्यासाठी निरनिराळीं कामें करणारीं २६० माणसें आहेत. कामाच्या आधुनिक पद्धती अमलांत आणल्यावर इतकीं माणसें लागूं नयेत असा कमिटीचा अभिप्राय आहे. गेल्या कांहीं वर्षांत ब्रिटन युरोपांतील कांहीं देशांच्या मानानें मागासलेलें झालें आहे. ब्रिटनला सर्वच बाबतींत अद्ययावत् करण्यासाठी राणीचे यजमान, प्रिन्स फिलिप ह्यांनीं पुढाकार घेतलेला आहे. राणीच्या बकिंगहॅम राजवाड्यांतील कामकाज अत्याधुनिक पद्धतीनें चालावें म्हणून त्यांनींच आग्रह धरलेला होता.

## दि कोल्हापूर शुगर मिल्स लि., कोल्हापूर

### चेअरमन श्री. रामनिवास रामनारायण रुईया यांचें ३० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेंतील भाषणाचा गोषवारा.

सद्गृहस्थहो,

अहवाल सालांत साखरेचें उत्पादन ३,८०,२२१ क्विंटल पोर्ती इतकें झालें. आपल्या कारखान्याच्या दृष्टीनें हा सर्वांत मोठा उच्चांक आहे. महाराष्ट्रांत आमचें हें उत्पादन सर्वांत जास्त आणि अखिल भारतांत दुसऱ्या क्रमांकाचें ठरलें आहे. त्यामागील सालांतील उत्पादन २,६९,८९० पोर्ती होतें. साखरेचे उताराचें प्रमाण सरासरीनें शेंकडा १२·४७ टक्के पडलें. मागील सालांत तें शेंकडा १२·४५ टक्के होतें.

आमच्या डिस्टिलरींतील अल्कोहोलचें गेल्या सालचें उत्पादन ७,३१,५८० गॅलन होतें तें अहवाल सालीं १२,५०,००० गॅलन-पर्यंत वाढलें. शेजारच्या कारखान्यांच्या महाराष्ट्र सरकारनें मंजूर केलेल्या मोलॅसिसचा संपूर्ण वापर करण्यांत आला. जुन्या व नव्या यंत्रसामुग्रीच्या वापरानें वार्षिक २० लाख गॅलन म्हणजे रोजीं ७,००० गॅलन उत्पादन होईल अशी अपेक्षा आहे. आणि उत्पादनक्षमता इतकी वाढविण्यास परवानगी मिळण्यासाठी तुमच्या मॅनेजिंग एजंट्सनीं यापूर्वीच मध्यवर्ती सरकारला विनंतीहि केलेली आहे. त्यासाठी ३५,००० मे. टन मोलॅसिसच्या पुरवठ्याची गरज लागेल आणि आमची डिस्टिलरी जिल्ह्यांतील शेजारच्या सर्व कारखान्यांची मोलॅसिस सहज उपयोगांत आणूं शकेल.

मिल्सच्या प्रगतीचें सिंहावलोकन करतांना माझें मन साहाजिकच २० वर्षांमागें जातें. आतां साखरेचें उत्पादन त्या वेळेपेक्षा ८ ते १० पटीनें वाढलें आहे, आणि शुगर मिल्स व डिस्टिलरी ह्या दोन्हींची यंत्रसामुग्री अद्ययावत् करण्यांत आली आहे. आणखी मिल्सनें अल्कोहोलवर आधारलेले नवे रासायनिक उद्योगधंद्यांचे प्रकल्प हातीं घेतले आहेत. मात्र हें लक्षांत घेतलें पाहिजे कीं, ह्या विकासासाठी गुंतविणें आवश्यक असलेलें साडेतीन कोटी रुपये भांडवल भागीदारांच्याकडून कांहींहि भांडवल न मागतां उभारण्यांत आलेलें आहे. भांडवलाची उभारणी आणि कारखान्याचा विस्तार यासाठी नफे परत धंद्यांत गुंतविण्याचे शहाणपणाचें व दूरदर्शी धोरण आपले मॅनेजिंग एजंट्स अनुसरीत आलेले आहेत. परंतु मला हें नमूद केलेंच पाहिजे कीं, करांचा अवजड बोजा, मालाच्या किमतींतील व वेतनांतील वाढ यामुळें अशी भांडवल-उभारणी अधिकाधिक कठीण होत आहे आणि १९६२-६३ मधील देशांतील औद्योगिक विस्तारांतील तौलनिक मंद गतीमध्यें तें व्यक्त होत आहे असें मला वाटतें.

दर एकरीं उत्पादन वाढविणें आणि प्रत सुधारणें हाच समतोल धोरणाचा पाया आहे. हें धोरण आमचा कारखाना अवलंबीत आला आहे हें नमूद करणेस मला समाधान वाटतें. पाणी, पैसा, बियाणें वगैरेंची आणि तांत्रिक मार्गदर्शनाची आम्हीं सोय केली आहे, हें आपणांस माहीत आहेच; आणि आमच्या ऊंस-विकास खात्यांत जरूर त्या फील्ड स्टाफबरोबरच बारा शेतकी पदवीधरहि आहेत व ही मदत घेणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या ५७०६ इतकी मोठी आहे.

विकासाच्या प्रश्नावर बोलावयाचें तर, राज्य सरकारनें विकास-कार्याकरितां बसविलेल्या केन-सेस व पर्चेस टॅक्स यांच्याद्वारें मिळून आम्ही आतांपर्यंत रु. ८७,२४,००० इतकी प्रचंड रक्कम भरलेली आहे. ऊंस वाहतूक सोयीची व कमी खर्चाची व्हावी म्हणून ऊंस वाहतुकीच्या क्षेत्रांत रस्त्याची सोय करणें हा विकासाचा एक मोठा भाग आहे. कोल्हापूर जिल्ह्यांत कारखान्यांच्या भागांत रस्ते बांधण्याची एक सर्वसाधारण योजना महाराष्ट्र सरकारनें थोड्या वर्षांपूर्वी तयार केली होती. प्रत्येक कारखान्याच्या क्षेत्रांत कांहीं विशिष्ट रकमा खर्च करण्याचेंहि योजण्यांत आलें होतें. दरम्यान जिल्हा परिषदा अस्तित्वांत आल्या आणि कारखान्यांच्या क्षेत्रांत रस्ते बांधण्याचें काम बाजूला टाकण्यांत आलें असें दिसतें. उद्योगधंद्यांप्रमाणेंच उत्पादक शेतकऱ्यांच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचें असलेलें हें काम हातीं घ्यावें अशी मी जिल्हा परिषदेला अगदीं आग्रहपूर्वक विनंती करतों. तसेंच राज्यसरकारलाहि मी अशी विनंती करतों कीं, जिल्हा परिषदांना अनुदानें देतांना कारखान्यांनीं उंसावरील करांच्या आधीं दिलेल्या व सध्या देत असलेल्या रकमांच्या प्रमाणांत, कांहीं विशिष्ट रकमा प्रत्येक कारखान्याच्या क्षेत्रांत रस्ते बांधण्यासाठी ठरवून द्याव्यात.

आपला कारखाना वस्तुतः पंचगंगा नदीनें तीन बाजूंनीं वेढलेला आहे. पलीकडील ऊंस आणण्याच्या दृष्टीनें वाहतुकीचें अंतर कमी करण्यासाठी नदीवर योग्य असे एक-दोन पूल तरी बांधले गेले पाहिजेत. हल्लीं फक्त एकाच ठिकाणीं पूल आहे आणि नदीपलीकडील ठिकाणचा मैल-दोन मैलावरचा ऊंस फॅक्टरीला आणण्यासाठी ८ ते १० मैलांची वाहतूक करावी लागते. गुळाकडे जाणारा ऊंस साखरधंद्याकडे येतांना शेतकऱ्यांनाहि फायदेशीर व्हावा याकरितां वाहतुकीचा खर्च कमी झाला पाहिजे. सरकार, साखर व गूळ यामधील उंसाच्या बाबतींतील स्पर्धा कमी करण्यासाठी उपाय योजीत आहे. वाहतूक खर्च कमी झाला असता हें बऱ्याच अंशानें साध्य होईल.

सन १९६१ च्या 'महाराष्ट्र शेतजमीन ( कमाल धारणा ) कायदा' खालीं स्टेट फार्मिंग कॉर्पोरेशननें आपल्या जादा जमिनी ( ११३४ एकर ) त्यावरील नोकरवर्गासह १ ऑगस्ट १९६३ रोजीं ताब्यांत घेतल्या आहेत. शेतीची यंत्रसामुग्री ताब्यांत घेणें, बांधकामाची किंमत ठरविणें, यावद्दलच्या वाटाघाटी चालू आहेत. आमचें इरिगेशन खातें आमच्याकडेच राहील, आणि उभयमान्य ठरणाऱ्या अटींप्रमाणें आम्हांस कॉर्पोरेशनला पाणी-पुरवठा करावा लागेल. अलीकडेच मुंबई हायकोर्टानें या कायद्याचें २८ वें कलम घटनाबाह्य ठरविलें आहे व सुप्रीम कोर्टाकडे अपील करण्याची परवानगी नुकतीच सरकारला मिळाली आहे. ही बाब न्यायप्रविष्ट असल्यानें त्यावर मी अधिक बोलणें योग्य होणार नाहीं.

तिसऱ्या योजनेंतील साखर उत्पादनाचें लक्ष्य ४० लाख टन ठरविण्यांत आलेलें आहे; आणि तें चालू वर्षासाठी ३३ लाख टन आहे. महाराष्ट्र राज्याला ६·५ लाख टनाचें लक्ष्य ठरवून देण्यांत आलें आहे, आणि त्यांतील आमचा हिस्सा ४२,००० टन आहे. म्हणजे गेल्या वर्षापेक्षा सुमारें ४०,००० किंटल पोत्यांचें अधिक उत्पादन करावयाचें आहे.

मला असें समजलें आहे कीं, गूळ बाजारांतील भडकलेल्या किमती व गुळासाठी होत असलेला उंसाचा अधिक वापर यांमुळें आमच्या कारखान्यासाठी ठरविलेल्या ४२,००० टन लक्ष्याच्या जवळपासहि पोहोंचणें कठीण होईल.

माजी अन्नमंत्र्यांच्या दूरदृष्टीच्या धोरणामुळें आंतरराष्ट्रीय बाजारांत साखरेची निर्यात करणारा म्हणून आमच्या देशास

सुदैवानें आतां बरेंच महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें आहे. साखर ही आतां परकीय चलन मिळवणारी महत्त्वाची वस्तु झाली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारांत किमतीहि चढल्या आहेत आणि निर्यातदार म्हणून आम्ही आमचें स्थान स्थिर करण्याची हीच योग्य संधि आहे.

आपणांस माहीतच आहे कीं, आपल्या कारखान्याला रोज १,७०० टन ऊंस गाळण्याचा परवाना आहे. परंतु प्रत्यक्षांत २,५०० ते २,६०० टन गाळप होतें. गाळप शक्तींतहि शेंकडा ५० टक्क्याची वाढ करण्यांत यश मिळविण्यांत आलें, याबद्दल माझ्याबरोबर आपणहि कौतुकच कराल. हें लक्षांत घेऊन तुमच्या मॅनेजिंग एजंटसूनीं रोजची ही गाळप शक्ति ३,००० टनांपर्यंत वाढवून मिळण्याची मध्यवर्ती सरकारला विनंति केली आहे.

आमच्या नव्या रासायनिक प्रकल्पांच्या आणि मुख्यत: ॲसेटिक ॲसिड कारखान्याच्या बाबतींत बोलावयाचें तर एका वा दुसऱ्या अपरिहार्य तांत्रिक (टेक्निकल) कारणामुळें त्यांतील प्रगति कांहींशी मंद झाली आहे. सर्वांत महत्त्वाची बाब वीज मिळण्याची आहे. परंतु हा कारखाना लवकर सुरू करण्याच्या दृष्टीनें हरप्रयत्न केले जात आहेत. आयात केलेलीं सर्व यंत्रें बसविण्यांत आलेलीं आहेत आणि कांहीं देशी साहित्य लवकरच मिळेल अशी अपेक्षा आहे. प्रयोगशाळेची इमारत पूर्ण झालेली आहे. रासायनिक प्रकल्पांच्या बाबतींत सरकारनें आम्हांला पुढीलप्रमाणें उत्पादनाचे आणखी परवाने दिलेले आहेत. इथिल ॲसिटेट (९०० टन), कार्बन-डायॉक्साइड (५४०० टन) व ड्राय आइस (३६०० टन). या बाबतींत यंत्रें व उपकरणें याबाबतच्या प्राथमिक चौकशींत प्रगति होत आहे.

ऑईल मिल्सच्या कामांत सुधारणा झाल्याचें अहवालांत पाहून आपणांस आनंद होईल.

साखरेची मागणी प्रथमच फारच वाढलेली दिसत आहे आणि आमचींच नव्हे तर देशांतील सर्व कारखान्यांचीं गुदामें नवीन सीझनपूर्वी रिकामीं झालेलीं दिसलीं. कारखान्यांच्या दृष्टीनें पाहिल्यास हें चांगलें लक्षण आहे, पण देशाच्या गरजांचा विचार करतां हें जरा चिंताजनक दिसतें. कारण आम्ही आमचे सर्व राखीव साठे संपवीत आहोंत, आणि जोंपर्यंत उत्पादन बऱ्याच प्रमाणांत वाढत नाहीं तोंपर्यंत गिऱ्हाइकांच्या दृष्टीनें हा प्रश्न येत्या कांहीं कालपर्यंत कठीण होईल. देशांतील उत्पादनाचा सध्यांचा कल पाहतां चित्र निश्चित उत्तेजनकारक दिसत नाहीं, किंबहुना थोडीशी काळजीच वाटते.

देशांतील वाढती मागणी व ठरविलेली निर्यातीची जबाबदारी या दोन्हीहि बाबी व उत्पादन लक्षांत घेऊन सरकारनें एप्रिल १९६३ मध्यें शुगर कंट्रोल ऑर्डर काढून साखरेचा दर व वाहतूक यांवर निर्बंध आणून वांटपाचें नियंत्रण केलें. दरमहा होणाऱ्या नियंत्रित पुरवठ्याचें धोरण पूर्वीपासूनच चालूं होतें. परंतु गुळाच्या किमतींत सतत चालूं असलेला चढ लक्षांत घेतां साखरेच्या उत्पादनावर त्याचा बराच परिणाम होईल व साखरेची टंचाई अशीच चालू राहील असें वाटतें.

मला आणखी कांहीं बाबींचा अवश्य उल्लेख करावा असें वाटतें. नवीन साखरकारखाने काढण्याचे व जुन्या कारखान्यांच्या वाढीचे परवाने देतांना सहकारी कारखान्यांना उत्तेजन देण्याचें सरकारी धोरण दिसतें. माझ्या मतें राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें सरकारनें खासगी व सहकारी अशा दोन्हीहि बाजूंना सारखेंच उत्तेजन दिलें पाहिजे. असा समन्वय ऑस्ट्रेलियामधील साखर धंद्यांत उत्तम तऱ्हेनें साधलेला आहे.

गेल्या सालीं फॅक्टरी-पोंच उसाची दर टनीं किंमत रु. ५४-१० नवे पैसे होती. चालू सालीं सरकारनें ही किंमत दोन वेळां वाढविली व सध्यां ही रु. ६१·८० नवे पैसे आहे. प्रथम १८ नोव्हेंबर रोजीं किंमत वाढविण्यांत आली, व पुन्हां गेल्या आठवड्यांतच वाढ करण्यांत आली आहे; आणि ही किंमत नोव्हेंबर १ तारखेपासून ऊंस पुरवठा करणाऱ्यांना देणेची आहे. आपल्या लक्षांत येईल कीं, चालू सालचे उत्पादनापैकी साखर सरकारी हुकुमाप्रमाणें ही वाढ होणेपूर्वीच जुन्या भावांत विकलेली आहे. उसाची किंमत वाढल्यानंतर साखरेच्या किमतींतील वाढ त्या तारखेपासून व्हावयास पाहिजे होती. दोन्हीहि किमतींतील फरकाची रक्कम वसूल करण्याचें जरा अवघड कामहि कारखान्यांना करावयाचें आहे. आतां तर ठरविलेली किंमत शेतावरच द्यावी असा महाराष्ट्र सरकारचा आग्रह आहे. या व अशा हुकुमांच्यामुळें परिस्थिति थोडी घोटाळ्याची झाली आहे.

तीच गोष्ट अबकारी करांतील सुटीबद्दलहि म्हणतां येईल. साखरेच्या उत्पादनवाढीकरतां सरकारनें प्रथम मूळ अबकारी करांत सूट जाहीर केली. नंतर महाराष्ट्रांतील कारखान्यांना मद्रास, म्हैसूर व केरळ यांच्यामध्येंच समाविष्ट करून त्या सुटीचें प्रमाण कमी करण्याचा जो निर्णय घेतला, तोहि अशाच स्वरूपाचा आहे.

आपल्या धंद्याची उत्पादनक्षमता व कार्यक्षमता यांकडे मॅनेजिंग एजंट्स किती काळजीपूर्वक लक्ष देतात हें आपण पाहिलें आहे. तसेंच नोकरवर्गाचा शारीरिक, बौद्धिक व सांस्कृतिक विकास होण्याच्या बाबतींतहि कंपनीचा तितकाच कटाक्ष आहे. यासाठी कोल्हापूर शुगर मिल्स जिमखाना व जीवन कल्याण या दोन संस्थांना सढळपणानें उत्तेजन देण्यांत आलेलें आहे.

जीवन कल्याण वार्षिक नियतकालिकानें श्री. माधवराव बागल यांचें 'कोल्हापूरची कला आणि कलावंत' हें पुस्तक प्रसिद्ध केलें याचा खास उल्लेख केला पाहिजे.

संचालक मंडळावरील माझ्या सहकाऱ्यांनीं मला सतत मार्गदर्शन, सल्ला व पाठिंबा दिला याबद्दल मी त्यांचे आभार मानतों. कंपनीच्या कारभारांत आपण कटाक्षानें लक्ष घालतां याबद्दल मी आपणां सर्वांचेहि आभार मानतों.

शेवटीं कल्पक प्रेरणाशक्तीची दुर्मीळ देणगी आणि वास्तवाच्या स्पष्ट जाणिवेची जोड लाभलेले आमचे जनरल मॅनेजर श्री. मदनमोहन लोहिया यांच्या अत्यन्त कार्यक्षम व एकनिष्ठ कार्याबद्दल त्यांना आम्ही व आपण सर्वांनीं मन:पूर्वक धन्यवाद दिले पाहिजेत. त्यांना डेप्युटी जनरल मॅनेजर श्री. एस्. डी. पाटील व इतर सहकारी अधिकारी यांचें निष्ठापूर्वक व तत्पर असें जें सहकार्य लाभलें तेंहि नमूद करण्यास मला आनंद वाटतो. तसेंच त्यांना स्टाफ व कामगार यांचें मन:पूर्वक व संपूर्ण असें सहकार्य मिळत आहे.

---

## रासायनिक कारखान्याला विलंब

जर्मनीमधील चार कारखानदारांच्या सहकार्यानें पनवेल जवळ मूलभूत रासायनिक द्रव्यें तयार करण्याचा एक कारखाना काढण्यांत यावयाचा आहे. हा कारखाना सार्वजनिक मालकीच्या विभागांत स्थापन करण्यांत येणार असून त्याची रीतसर नोंदणीहि १९६० अखेर झालेली आहे. परंतु कारखान्याच्या उभारणीच्या कामाला विलंब लागणार आहे. त्यासाठी लागणारी यंत्रसामग्री पश्चिम जर्मनींतून आयात करावयाची आहे. यंत्रसामग्रीसाठीं लागणारें परदेशीय चलन नसल्यामुळें विलंब लागणें अपरिहार्य झालें आहे.

### ध्वनीपेक्षा अधिक वेगानें विमान प्रवास

एअर इंडिया कॉर्पोरेशनचे अध्यक्ष श्री. जे. आर. डी. टाटा ह्यांनीं पुढील दशकापासून होऊं घेतलेल्या विमानप्रवासांतील क्रांतीची कल्पना देणारी माहिती आपल्या एका व्याख्यानांत सांगितली आहे. त्यांच्या माहितीप्रमाणें १९७०-७२ च्या सुमारास जगांतील बहुतेक मोठ्या विमानवहातूक कंपन्या ध्वनीपेक्षा अधिक वेगानें प्रवास करणारीं विमानें वापरूं लागतील. इतक्या वेगानें प्रवास करणारीं विमानें बांधण्याच्या कामीं येणाऱ्या तांत्रिक व इतर अडचणी अर्थातच दुर्लंघ्य स्वरूपाच्या आहेत. त्यांतहि विमानांवर होणारा विश्वकिरणांचा मारा, वेगानें उत्पन्न होणारी उष्णता, आणि आर्थिकदृष्ट्या परवडणें न परवडणें, हे प्रश्न प्रमुख आहेत. ध्वनीपेक्षा अधिक वेगाचीं विमानें बांधण्याच्या कामीं फक्त पोलाद आणि टिटॅनिअम ह्यांचाच वापर करतां येणें शक्य आहे. इतर धातूंच्या साह्यानें बनविलेलीं विमानें टिकूं शकणार नाहींत. कारण ह्या विमानांचा वेग दर तासाला १,४०० मैलांच्या आसपास असेल. विमानांचा पूर्ण वेग फक्त खुल्या समुद्रावर आणि वस्ती नसलेल्या प्रदेशावर घेतां येईल. ह्या विमानांच्या साह्यानें लंडनहून सकाळीं निघालेला माणूस न्यूयॉर्कला जाऊन आपलें काम करील आणि लगेच संध्याकाळीं परत लंडनला येऊ शकेल. ब्रिटनच्या व फ्रान्सच्या सरकारांनीं पाठिंबा दिलेला विमान-कारखान्याचा गट अशा प्रकारचें एक विमान बांधूं लागला आहे. त्यांत १०० प्रवाशांची सोय करण्यांत येत आहे. अमेरिकेंतील तीन विमानकंपन्याहि सरकारच्या पुरस्कारानें थोडेसें अधिक मोठें आणि अधिक गतिमान विमान बांधण्याच्या खटपटींत आहेत. ब्रिटिश-फ्रेंच कंपन्या बांधीत असलेल्या विमानाची किंमत ५ ते ६ कोटींच्या घरांत जाईल आणि अमेरिका बांधीत असलेल्या विमानाची किंमत ८ ते १० कोटींपर्यंत जाईल.

### प्रेंटिस-हॉल ऑफ इंडिया लि.

प्रेंटिस-हॉल, इन्कॉर्पोरेटेड, ह्या अमेरिकन प्रकाशन कंपनीनें भारतांत स्वतंत्र प्रकाशन संस्था स्थापन केली आहे. तिचें नांव प्रेंटिस-हॉल ऑफ इंडिया लि., असें आहे. नवी दिल्ली येथें तिची मुख्य कचेरी असून रॉबर्ट एल्. डोनॅहो हे तिचे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. भारतांत आणि आशियांतील इतर देशांत प्रसार करण्यासाठी शेंकडों अमेरिकन पुस्तकांचीं भाषांतरें ह्या कंपनीमार्फत प्रसिद्ध केलीं जातील. शास्त्रीय आणि तांत्रिक विषयांच्या पुस्तकांवर विशेष भर दिला जाईल, आणि मूळ अमेरिकन आवृत्तींच्या एकतृतीयांश ते एकचतुर्थांश किंमतीला तीं पुस्तकें विकलीं जातील. १९६२ सालीं प्रेंटिस-हॉलनें जपानमध्यें आणि ऑस्ट्रेलियांत स्वतंत्र प्रकाशन कंपन्या स्थापन केल्या. इंग्लंड, फ्रान्स, कॅनडा व मेक्सिको येथेंहि तिनें कंपन्या स्थापल्या आहेत. त्याखेरीज फिलिपाइन्स, दक्षिण आफ्रिका आणि ब्रॅझील येथें कंपनीच्या कचेऱ्या आहेत.

### बर्मा-शेलचा परवाना रद्द करणार

भारताच्या पेट्रोल व केमिकल्स खात्यानें बर्मा-शेल तेल कंपनीला असें कळविलें आहे कीं, कंपनीचा सध्यांचा परवाना लवकरच रद्द करण्यांत येणार आहे. भारतांत तेलाच्या उद्योगधंद्याची उभारणी करतांना कंपनीची मदत झाली. तिचा विचार कंपनीशीं नवा करार करतांना सरकार करणार आहे परंतु नव्या कराराबद्दल आगाऊच कांहीं आश्वासनें देण्याची मात्र सरकारची तयारी नाहीं.

सरदारगृह
मुंबईंत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.
— आमचीं वैशिष्ट्यें —
* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्म-शताब्दि दिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.
फोन नं. :-३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार-सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.




बेडेकर
मसाले, लोणचीं
व पापड
आपल्या जेवणांत
विशेष लज्जत
आणतील.
वापरून पाहा.
मुगभाट, मुंबई ४.
शाखाः ठाकुरद्वार, दादर, कोट व परळ.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES
Make doubly sure by fitting



GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA
MANUFACTURERS OF
MACHINE SPARE PARTS & TOOLS

### लष्कराला लागणाऱ्या मोटारींचें उत्पादन

लष्कराला लागणाऱ्या मोटारींचें उत्पादन वाढविण्याच्या कामीं भारताला अमेरिकेकडून मदत मिळण्याची शक्यता आहे. अशा मोटारीच पुरविण्याची विनंती भारतातर्फे करण्यांत आलेली होती. संरक्षणकार्यांत मोक्याच्या ठरणाऱ्या मोटारी आणि इतर साहित्य ह्यांच्या उत्पादनांत भारताला शक्य तितकें स्वावलंबी करण्यांतच भारताचें हित असल्याचें अमेरिकन तज्ज्ञांचें मत आहे. म्हणून लष्करी मोटारी पुरविण्याऐवजी भारतांतच त्यांचें उत्पादन करणें सोयीस्कर आहे. शिवाय आयत्या मोटारी पुरविण्यापेक्षा मोटारी तयार करण्याच्या सोयी उपलब्ध करून देणेंच आर्थिकदृष्ट्या अधिक परवडणारें आहे. चीनची भारताला असणारी भीति बराच काल टिकणारी असल्यामुळें अमेरिकेकडून मिळणाऱ्या लष्करी स्वरूपाच्या मदतींत फारशी कपात होण्याचा संभव नाहीं.

### मद्रास राज्यांतील वृद्धवेतन मिळणाऱ्यांची संख्या

मद्रास राज्य सरकारनें ६५ वर्षांवरील वृद्ध व निराधार माणसांना पेन्शन देण्याची योजना सुरू केली तेव्हां अशा लोकांची संख्या ४० हजारांच्या आसपास होती. आतां त्यांची संख्या ५५ हजारांपर्यंत पोंचली आहे. ६५ वर्षें वयाची अट सरकार अगदीं कांटेकोरपणानें पाळतें असें नाहीं. समाजांतील वृद्ध व निराधार लोकांची संख्या अलीकडे वाढत चाललेली आहे. हिंदु अविभक्त कुटुंबपद्धतीचा झालेला ऱ्हास, वाढती महागाई आणि तज्जन्य भावनाशून्यता, अशीं अनेक कारणें ह्या घटनेशीं संबद्ध आहेत. आर्थिकदृष्ट्या भारभूत झालेल्या वृद्धांना कमीअधिक प्रमाणांत मानहानि सोसावी लागते. पण त्यांतहि लाजिरवाणें दारिद्र्य त्यांच्या नशिबीं आल्यास त्यांची अवस्था दयनीय होते. कांहीं कनिष्ठ सरकारी नौकरांना तर वृद्धवेतनापेक्षाहि कमी निवृत्तिवेतन मिळतें.

### नागपूर जवळ कोळशाच्या नव्या खाणी

राष्ट्रीय कोळसा विकास मंडळानें नागपूर जिल्ह्यांतील उमरेड भागांत कोळशाचा शोध चालविला होता. मंडळातर्फे करण्यांत असलेल्या खोदाईंत उमरेड भागांत ४० फूट खोलीवर कोळशाचा थर सांपडला आहे. एकूण सुमारें ५० चौरस मैल प्रदेशांत चांचणी करण्यांत आली असून सांपडलेला कोळशाचा थर बराच जाड आहे. महाराष्ट्रांतील सार्वजनिक मालकीच्या विभागांतील ही पहिलीच कोळशाची खाण होईल. ह्या खाणींतून पुढील वर्षीं २० हजार टन कोळसा काढण्यांत येईल कोळशाचें अंतिम उद्दिष्ट दरसाल १० लाख टन ठरविण्यांत आलें आहे.

### रशिआच्या लष्करी खर्चांत कपात

रशिआनें आपल्या १९६४ च्या लष्करी अंदाजपत्रकांत ४·३ टक्के कपात करण्याचें ठरविलें आहे. गेल्या वर्षीं लष्करी अंदाजपत्रकांत ५० कोटी रुबल्स म्हणजे सुमारें १९·४ कोटी पौंडांची वाढ करण्यांत आली होती. १९६४ च्या अंदाजपत्रकांत ६० कोटी रुबल्स म्हणजे सुमारें २४·६ कोटी पौंडांची कपात करण्यांत आली आहे. आंतरराष्ट्रीय परिस्थिति सुधारण्याच्या कामीं रशिआच्या ह्या धोरणाचें साह्य होईल असा निरीक्षकांचा अंदाज आहे. तथापि, रशिआच्या अंतर्गत अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनेंहि हा निर्णय महत्त्वाचा आहे. रशिआंतील शेतीचें उत्पादन अजूनहि मागासलेलें आहे. तें वाढविण्यासाठी रासायनिक खतांची अतिशय आवश्यकता आहे. खतांचें उत्पादन वाढविण्यासाठी रशिआनें रासायनिक उद्योगधंद्यांत अधिक भांडवल गुंतवणूक करण्याचें ठरविलें आहे.

### टायर-ट्यूब करण्याची यंत्रसामग्री

टायर्स व ट्यूब्स तयार करण्याच्या कारखान्याची यंत्रसामग्री बनविण्याच्या एका कारखान्यास परवानगी देण्याचा विचार भारत सरकार करीत आहे. गेल्या दहा वर्षांत टायर्स व ट्यूब्स तयार करण्याच्या कारखान्यांनीं चांगली प्रगति केलेली आहे. ह्या उद्योगधंद्यांतील उत्पादन ह्या कालांत १५ टक्क्यांनीं वाढलेलें आहे. टायर्स व ट्यूब्सला देशांत चांगली मागणी असून त्यांच्या किमतीहि फार वाढू न देण्यांत यश आलेलें आहे. देशांतील गरज भागवून कांहीं माल परदेशांत निर्यात करण्याची तयारी चालू आहे. ह्या धंद्याची प्रगति अशीच चालू राहिली तर चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या मध्याच्या सुमाराला धंदा चांगल्या मजबूत पायावर उभा राहील आणि देशांतील गरज भागवून मालाची निर्यातहि करूं लागेल.

### हैदराबादमधील गलिच्छ वस्त्यांत वाढ

हैदराबाद शहरांतील गलिच्छ वस्त्यांत वाढ होत चाललेली आहे. सुमारें ४ लाख लोक ८० हजार झोपड्यांतून किळसवाण्या परिस्थितींत जगत आहेत. हैदराबाद शहराच्या लोकसंख्येच्या एकपंचमांश त्यांची संख्या आहे. शहराचा विस्तार ८० चौरस मैलांवर पसरलेला असून त्यांतील गलिच्छ वसाहती सालोसाल अधिकच होत आहेत. दरसाल हजारों लोक नव्यानें येऊन वस्ती करीत आहेत. ह्याच्या मागें आर्थिक कारणें प्रमुख आहेत. हैदराबादच्या आसपासच्या भागांतच दरसाल सुमारें ५० हजार लोक रोजगार मिळविण्यासाठी येतात. त्यांपैकी बहुतेक बांधकामाच्या धंद्यांत राहातात. त्याशिवाय प्रासंगिक मोलमजुरी, रिक्षा ओढणें, इत्यादि कामांतहि कांहीं लोक सामावले जातात. गेल्या कित्येक वर्षांत गलिच्छ वस्त्या नाहींशा करण्याचे कामीं अनास्था दाखविली जात आहे. सूत्रबद्ध योजनेच्या अभावीं मध्यवर्ती सरकारकडून आलेली मदत रद्द होत आहे.

### वैदिक ऋच्यांचें ध्वनिमुद्रण

त्रिवेंद्रम येथील प्राच्यविद्यांच्या हस्तलिखितांच्या ग्रंथालयानें वैदिक ऋच्यांचें ध्वनिमुद्रण करून त्यांचा संग्रह करण्याचें ठरविलें आहे. ही संस्था केरळ विद्यापीठाशीं जोडलेली आहे. वेदांतील मंत्र व ऋचा शुद्ध स्वरूपांत म्हणूं शकणारे विद्वान् ब्राह्मण दिवसानुदिवस दुर्मीळ होत आहेत. शिवाय ऋचा म्हणण्याच्या पद्धतींतहि स्थानिक भेद आढळून येतात. त्यामुळें त्यांचें ध्वनिमुद्रण करणें अगत्याचें झालें आहे. ध्वनिमुद्रणासाठी मलबार आणि तामीळनाडमधील वैदिकांची निवड करण्यांत येणार आहे.

### इंडिअन एअर लाइन्ससाठी नवीं विमानें

इंडिअन एअर लाइन्स कंपनीनें फ्रेंच बनावटीचीं तीन नवीन विमानें मागविलीं आहेत. त्यांपैकी एक विमान नुकतेंच दिल्लीच्या विमानतळावर उतरलें. विमान हिंदी वैमानिकानेंच आणलें. आणखी महिनाभराच्या अवधींत उरलेलीं दोन विमानें भारतांत येतील. 'कारव्हेल' जातीचीं हीं विमानें चालविण्यासाठी २५ वैमानिकांना शिक्षण देण्यांत येत आहे. त्यांपैकी ११ जण फ्रान्समध्यें आणि १४ जण हैदराबाद येथें शिक्षण घेत आहेत. देशांतर्गत वाहतुकीसाठी हीं विमानें वापरणारी इंडिअन एअर लाइन्स ही आशिआंतील पहिलीच कंपनी आहे. नव्या विमानांत ८४ प्रवासी बसूं शकतात आणि त्यांचा वेग दर तासाला ५१० मैल इतका आहे. इंडिअन एअर लाइन्सची कांहीं व्हायकौंट विमानें इतर प्रादेशिक मार्गांवर वाहतूक करण्यासाठी मोकळीं होतील.

### ब्रिटनमधील वाढत्या मोटारींची समस्या

ब्रिटनमधील मोटारींची संख्या वाढत चालल्यामुळें मोठ्या शहरांतून मोटारवाहतुकीची फार कुचंबणा होऊं लागली आहे. १९६३ च्या प्रारंभीं ब्रिटनमध्यें निरनिराळ्या प्रकारच्या १·५ कोटी मोटारगाड्या होत्या. १९७० च्या सुमारास त्यांची संख्या १·८ कोटीपर्यंत पोंचण्याची शक्यता आहे. ह्यांपैकी दोनतृतीयांश गाड्या टूरिंग पद्धतीच्या असतील. १९८० च्या आसपास एकूण मोटारींची संख्या २·७ कोटीपर्यंत आणि टूरिंग गाड्यांची संख्या १·९ कोटींपर्यंत जाईल. मोटारींच्या संख्येंतील वाढीमुळें शहरांतील रस्त्यांची पुनर्रचना करावी लागेल व त्यासाठी मोठाल्या रकमा खर्चाव्या लागतील. तसें न केल्यास मोठाल्या शहरांतून मोटारींची उपयुक्तता झपाट्यानें कमी होईल, असा इशारा तज्ज्ञांनीं दिला आहे.

### औद्योगिक भांडवल गुंतवणूक मंडळ

मध्यप्रदेश सरकारनें एका इंडस्ट्रिअल इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशनची स्थापना करण्याचें ठरविलें आहे. कॉर्पोरेशनचें भांडवल १ कोटी रुपयांचें राहील. प्रारंभीं मध्यप्रदेश सरकार कॉर्पोरेशनमध्यें २६ लाख रुपये गुंतविणार आहे. पण नंतर गुंतवणूक ५१ लाखांपर्यंत वाढविण्यांत येणार आहे. बाकीच्या भांडवलाची उभारणी भाग-भांडवलाची सार्वजनिक विक्री करून करण्यांत येणार आहे. खासगी कंपन्या तोट्यांत चालत असल्या तर त्यांनाहि कॉर्पोरेशन मदत करणार आहे.

### केनेडींचें मृत्युपत्र

ख्रिस्तवासी प्रेसिडेंट केनेडी ह्यांचें मृत्युपत्र प्रसिद्ध झालें आहे. तें मृत्युपत्र जून, १९५४ मध्यें बॉस्टन येथें करण्यांत आलेलें आहे. त्या मृत्युपत्रान्वयें, केनेडी ह्यांची मालमत्ता मिसेस केनेडी आणि दोन अपत्यें कॅरॉलिन आणि जॉन ह्यांत विभागली जाईल.

मिसेस केनेडी आणि प्रेसिडेंट केनेडींचे दोन बंधू (अटर्नी जनरल रॉबर्ट केनेडी आणि सेनेटर एडवर्ड केनेडी) हे एक्झिक्यूटर म्हणून निर्दिष्ट केलेलें आहेत.

मिसेस केनेडींना २५,००० डॉलर रोख आणि केनेडींची सर्व वैयक्तिक इस्टेट मिळावयाची असून बाकीच्या इस्टेटीचे दोन समान ट्रस्ट-फंड करावयाचे आहेत. पहिल्या फंडाचा फायदा मिसेस केनेडी ह्यांना व त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या मुलांना मिळेल. त्यानंतर पुढील वारसदारांना तो मिळेल.

दुसरा फंड जॉन आणि कॅरोलिन ह्यांत वाटला जाईल. कोणत्याहि एकाचा मृत्यु झाल्यास त्याचा वाटा दुसऱ्याला आपोआप मिळेल.

### मोटारप्रवासाच्या दरांत वाढ

मध्यप्रदेश सरकारनें रस्त्यावरील मोटारप्रवासाचे दर किलोमीटरमागें ३·२ नये पैसे करण्याचें ठरविलें आहे. हा दर सर्व राज्यभर लागू करण्यांत येणार आहे. ह्यापूर्वी निरनिराळ्या मार्गांवर निरनिराळ्या दरानें भाड्याची आकारणी करण्यांत येत असे. जुने दर मैलामागें ६ ते ९ पै असे होते. नव्या दरामुळें स्टेट रोड कॉर्पोरेशनला ६६ लाख रुपये अधिक उत्पन्न होईल.

### प्रत्येकाचा टॉवेल वेगळा हवा

ड्यूसेलडॉर्फ ॲकॅडेमी ऑफ मेडिसिननें, हॉटेलांतील टॉवेल्सची आरोग्यदृष्ट्या तपासणी करण्यासाठी आपले प्रोफेसर १३६ हॉटेलांतून पाठविले. कुणी पाहात नाहीं अशी खात्री करून, संशोधक आपल्या खिशांतून कार्डाच्या आकाराचा एक ओलसर स्वच्छ कागद काढून टॉवेलावर दाबायचे आणि तो बॅगमध्यें ठेवायचे. संशोधनशाळेंत ह्या कागदांची जंतूंच्या दृष्टीनें तपासणी केली जाई. ७० टॉवेलांत इतके जंतू आढळले कीं, ते मोजतां येणेंहि अशक्य झालें. ६३ टॉवेलांतील जंतूंचें प्रमाण प्रत्येक चौरस सेंटिमीटरला १६,५२७ जंतू, असें आढळलें. जंतूंच्या संख्येपेक्षा त्यांचें स्वरूप भयानक होतें. स्टॅफिलोकॉकाइनें भरलेले निम्म्याहून अधिक टॉवेल होते. (ह्या जंतूंमुळें गळवें होतात). एकतृतीयांश टॉवेल्सवर कोलॉन जंतू होते. (ह्या जंतूंमुळें हगवण, टायफॉइड, इत्यादि रोग होतात.)

कित्येक इस्पितळांतून आणि दवाखान्यांतूनहि एकाच टॉवेलानें अनेकांचें काम भागविलें जातें. एका इस्पितळाचा बाळंतपणाचा विभाग तर फारच जंतुयुक्त आढळला; तेथील बाळंतिणी आपल्या बाळाबरोबर जंतूंची लागणहि घरीं घेऊन जायच्या. हात पुसण्या-करितां अनेकांचें एकाच टॉवेलवर भागविणें कसें घातुक आहे, हें ह्यावरून दिसून येईल. पूर्वी प्रत्येकाजवळ तोंड पुसायला उपरणें असायचें, किंवा खांद्यावर पंचा असायचा; ती पद्धत सध्यांच्या जेवणावळींचे वेळीं सर्वांसाठी हात-तोंड पुसायला एकच टॉवेल वापरण्याच्या पद्धतीपेक्षा कितीतरी आरोग्यकारक होती. पुष्कळ लोक त्याच टॉवेलाचा पाय पुसण्यासहि उपयोग करतात. रोग फैलावण्याचीं हीं कारणें नाहींशीं करणें, निदान स्वतःला जंतूंमुळें रोग होणें टाळणें, प्रत्येकाला शक्य आहे.

एक रसायनशास्त्रज्ञ होते. ते जेवणापूर्वी किंवा कांहींहि खाण्यापूर्वी दोनहि हात पाण्यानें धुवून तसेंच हवेंत वाळवीत असतात; टॉवेलानें पुसत नसत. तेव्हां त्यांची खूप चेष्टा व्हायची. नखांना मेंदी लावून ती वाळविणाऱ्या मुलींप्रमाणें ते आपल्या हाताचीं बोटें फाकून वाळवायचे! त्यांच्या ह्या दक्षतेमध्यें किती अर्थ होता, हें त्या वेळीं त्यांना जंतूंच्या हिशेबांत सांगतां आलें नाहीं. प्रत्येकाचें हातपुसणें आणि अंगपुसणेंहि स्वतंत्र असण्याचें महत्त्व पटल्यावर तरी तशी सुधारणा अगत्य करायला हवी. प्रत्येकाच्या हातपुसण्यावर व अंगपुसण्यावर ज्याचें त्याचें आद्याक्षर लिहिलेलें असलें, म्हणजे तीं बदलण्याचा प्रश्न उपस्थित होत नाहीं.

### बँक ऑफ महाराष्ट्राची चेंबूर शाखा

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. ची चेंबूर येथील शाखा शुक्रवार, दिनांक २७ रोजीं सुरू झाली.

### हिंदुस्थान स्टील लि.

हिंदुस्थान स्टील लि. ला १९६२-६३ मध्यें ६·३४ कोटी रु. नफा झाला. परंतु कंपनीचा सांठलेला तोटा ६१·५० कोटी रुपये आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## कांहीं तुलनात्मक आंकडे

| | दर माणशीं उत्पन्न (रु.) | दर माणशीं विजेचा खप ह. कि. वॅ. | दर मोटारी-मागें माणसें | दर रेडिओ-मागें माणसें | दर टेलिफोन-मागें माणसें | दर डॉक्टर-मागें माणसें | दर माणशीं कॅलरीज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ऑस्ट्रेलिया | ५,९२३ | ३,९०२ | ५ | ४ | ३ | ८५४ | ३,२६० |
| कॅनडा | ६,७५६ | ५,६७९ | ४ | २ | ३ | ९२७ | ३,१५० |
| प. जर्मनी | ४,७०४ | ३,६५१ | ८ | ३ | १० | १,००४ | २,९४० |
| फ्रान्स | ४,५४५ | २,४०२ | १३ | ३ | ९ | ७०१ | २,९४० |
| इटली | २,४०१ | १,१८६ | २५ | ६ | १४ | ६९७ | २,७४० |
| जपान | १,६१९ | १,१६४ | २२२ | ६ | १७ | ९४१ | २,२१० |
| ग्रेट ब्रिटन | ५,१६९ | ४,९२० | ९ | ३ | ६ | १,०३० | ३,२९० |
| अमेरिका | १०,८९६ | ८,१०३ | ३ | १ | २ | ८०६ | ३,१२० |
| भारत | ३२७ | १४० | १,५४५ | २०१ | ९९० | ४,९९७ | १,९८० |

### रिक्षा ओढणाऱ्यांना पर्यायी रोजगार नाहीं

नागपूर शहरांत माणसांनीं ओढावयाच्या रिक्षा चालू आहेत. ह्या लोकांना परवाने दरसाल नवे घ्यावे लागतात. परवान्यांचें नूतनीकरण करण्याबाबत सरकारनें कांहीं निर्बंध जाहीर केले होते. परंतु रिक्षा ओढणाऱ्यांच्या संघटनेनें नवीन परवाने देणें चालू ठेवण्याची मागणी केली होती, ती सरकारनें मान्य केली आहे. रिक्षा ओढणाऱ्यांना पर्यायी रोजगार दिल्याशिवाय परवाने रद्द केले तर हजारों लोक बेकार होतील असें संघटनेचें म्हणणें आहे.

### चीनची फ्रान्सकडून खरेदी

चीन फ्रान्सकडून कांहीं जेट विमानें आणि औद्योगिक यंत्र-सामग्री खरेदी करण्याच्या खटपटींत आहे. चीनचा हा प्रयत्न यशस्वी होण्याच्या मार्गावर आहे, असें म्हणतात. फ्रान्स व चीन ह्यांच्यांत होऊं घातलेल्या ह्या व्यापारी देवाणघेवाणीमुळें अमेरिका व फ्रान्स ह्यांचे संबंध कटुतेचे होऊं लागले आहेत. चीनला रशिआकडून होणारी औद्योगिक मदत जवळ जवळ बंद झाल्या-मुळें चीन पश्चिम युरोपशीं व्यापार करण्याच्या मार्गे आहे.


# दि सरदार
# कारबोनिक गॅस कंपनी लि.

उत्पादक

**कारबोनिक ॲसिड गॅस**

**सुका बर्फ, सोडा वॉटर मशिनरी**

**आणि**

**खनिज पाण्याच्या आवश्यकतेसंबंधीं विक्रेते**

रजिस्टर्ड हेड ऑफिस आणि एजन्टस्चें ऑफिस

सर विठलदास चेंबर्स, १६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

फॅक्टरी ऑफिस : कॅनॉट रोड, माझगांव, मुंबई. टे. नं. ४०८१२

शाखा आणि फॅक्टरी

१ केडल रोड, दादर, फ्रिझाइट फॅक्टरी टे. ६१११९
२ काम्पटी फॅक्टरी एरिया, रेल्वे स्टेशनच्या दक्षिणेस, काम्पटी ( कँट ) टे. १०८
३ दिल्ली–रामबाग रोड, बंगेश पूल टे. २२४७०१
४ कलकत्ता–१०२ ए फोरशोर रोड, शिवपूर, हावरा. टे. ६७–२२४७
५ विजयवाडा–गुणदला, कृष्णाजी स्ट्रीट, आंध्र प्रदेश टे. २०४१
६ रावळपिंडी–डलहौसी रोड.

सर्व शाखांसाठी आणि फॅक्टऱ्यांसाठी टेलिग्राफिक पत्ता : ' कारबोनिक '


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.